# आई




(चित्र: सौ. रेखा भिवंडीकर)

Memoir हे चित्रप्रदर्शन पाहिल्यानंतर मन तिथेच रेंगाळत राहिलं. त्या चित्रांनी असा फेर धरला की दुसरं काही सुचत नव्हतं. ही कविता स्फुरली आणि मगच बरं वाटलं.

ती आई होती म्हणूनी घनव्याकुळ मीही झालो
किती वेळ आतल्या आत दुलईला कवळून बसलो

तो स्पर्श मुलायम होता; जरी हात राबले होते
कष्टाने ओढीत होती ते शुभ्र पिठाचे जाते

बागेला फुलण्याचेही ती स्वप्न दाखवीत होती
फुलताना मजलाही 'ती' 'ही' फुले देऊनी गेली

किती काळ लोटला आहे ती पुन्हा समोरी आली
मायेच्या ओलाव्याने मज चिंब भिजवूनी गेली

ती आई होती म्हणूनी...

**- नरेंद्र प्रभू**

http://prabhunarendra.blogspot.com/
http://shabdshabd.blogspot.com/